# जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कार्यालय, जिल्हा अमरावती.

*****************************************************************************

क्र.प्र.अ/भु.सं/अ.का./कावि 206/२०२० दिनांक :-28/3/२०२०

*****************************************************************************

## "कलम १९"

## घोषणा

(भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३)

**भु.सं.प्र.क्र. २९/४७/२०१७-१८, मौजा असदपुर, ता.अचलपुर, जि.अमरावती**

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांनी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोटकलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसुचना **क्र. ०९/२०२० दि. ०२/०१/२०२०** अन्वये प्रारंभीक अधिसुचना काढलेली आहे आणि त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनूसुचि एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसुचि दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, **अमरावती** जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांनी, कलम १५ च्या पोट कलम (२) अन्वेय दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त **सार्वजनिक प्रयोजनासाठी** उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत प्रायोजनासाठी "बुडीत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले असुन, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी,उक्त अधिनियामान्वये जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपजिल्हाधिकारी(भूसंपादन), अ.व.प्र.क्र.-४, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती** यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची - एक

## जमिनीचे वर्णन

गाव- **असदपुर** तालुका- **अचलपुर** जिल्हा - **अमरावती**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर./ गट नंबर | सं.मो. प्रमाणे क्षेत्र (हे. आर मध्ये) |
|---|---|---|
| १ | ४६३ पैकी | ०.२१ |
| | एकुण | ०.२१ |

## अनुसूची - दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव** :- चंद्रभागा बॅरेज बृहत लघू प्रकल्प

**प्रकल्प कार्याचे वर्णन** :- चंद्रभागा बॅरेज बृहत लघू प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राकरीता

**समाजाला मिळणारे लाभ** :- चंद्रभागा बॅरेज बृहत लघू प्रकल्पामुळे प्रत्यक्ष सिंचनाचा फायदा होणार असुन लाभ क्षेत्रातील संबंधीत शेतक-यांचे जीवनमान उंचवणार आहे.शेतक-यांचे उत्पन्न वाढुन कृषी संपत्तीत वाढ होणारआहे.

## अनुसूची - तीन

## पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

गाव- **निरंक** तालुका- **निरंक** जिल्हा - **निरंक**

| अ.क्र | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित संपादन क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|
| | निरंक | |

## अनुसूची - चार

**( पुनवर्सन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश )**

**दिनांक :-** १६/ ३ /२०२०
**ठिकाण :- अमरावती.**

**उपजिल्हाधिकारी (भुसंपादन)**
**अ.व.प्र.क्र.-४,अमरावती.**

**(शैलेश नवाल)**
**जिल्हाधिकारी अमरावती**